महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

इमेलः roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२१/ 1722 दिनांक : 30 JUN 2021

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था,
औरंगाबाद विभाग,

विषय :- केंद्र पुरस्कृत जलशक्ती अभियान माहिमे बाबत...

संदर्भ :- मा.संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/संकीर्ण/२०२१/१९६, दि.२५/०६/२०२१

उपरोक्त संदर्भियविषयान्वये आपणास कळविण्यात येते की, जलसंवर्धनाचे महत्व विद्यार्थ्यामध्ये बिंबविण्याच्या दृष्टीने तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांमध्ये जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने संस्था स्तरावर जलसंवर्धन व जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रम प्रभावी पणे राबविण्यात याव्यात या बाबत संदर्भिय पत्रात स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. त्या दृष्टीने आपल्या संस्थेने जलशक्ती अभियानासंदर्भात उपक्रम सुरू करून सदर उपक्रमांबाबतचा प्रगती अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९४३६ /७६,
ई-मेल- desk16@dtemaharashtra.gov.in. वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**ईमेलव्दारे**
**महत्वाचे / तातडीचे**

**क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०२१/१९६**
**दिनांक:** २५।६।२०२१

**प्रति,**
**१) सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कायालय,**
**मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर**
**२) सचिव,**
**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,**
**मुंबई.**

**विषय : केंद्र पुरस्कृत जलशक्ती अभियान मोहिमेबाबत.**
**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३७/ विशि-५, दिनांक २३.३.२०२१**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित शासन पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान महोदयांनी जलशक्ती मंत्रालयामार्फत, २२ मार्च या जलदिनाचे औचित्य साधून जलशक्ती अभियान Catch the Rain या मोहिमेची सुरूवात दिनांक २२.३.२०२१ पासून केलेली आहे.

यासंदर्भातील भारत सरकार कडून प्राप्त झालेल्या टिप्पणीची प्रत व विश्वविद्यालय अनुदान आयोगाने दि.१९.३.२०२१ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व विद्यापिठांना, महाविद्यालयांना, संस्थांना दिलेली सूचनेची प्रत सोबत जोडत आहे.

जलसंवर्धन व जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत केंद्र शासनाने व विश्वविद्यालय अनुदान आयोगाने सूचना दिलेल्या आहेत. जलसंवर्धनाचे महत्व विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्याच्या दृष्टिने तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांमध्ये जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे, सर्व महाविद्यालये, सर्व शैक्षणिक संस्था स्तरावर जलसंवर्धन व जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रम प्रभाविपणे राबविण्याबाबतच्या सूचना तातडीने आपल्या स्तरावरून आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना देण्यात याव्यात.

तसेच यासंदर्भात संस्थांनी सादर केलेला आराखडा व जलशक्ती अभियानासंद्भर्भात सुरू केलेल्या उपक्रमांबाबतचा प्रगती अहवाल या संचालनालयास दर महिन्याला एकत्रितरित्या सादर करावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

आपला,

( प्रमोद नाईक )
**सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई**

**प्रत :** **१) श्री. अजित बाविस्कर, उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई**
**२) कार्यासन क्रमांक २, २अ व १०, मुख्य कार्यालय, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीकरिता.**

Directorate of Technical Education
Maharashtra, Mumbai, India

**Asmita Naik <pa2director@dtemaharashtra.gov.in>**

---

# Fwd: केंद्र पुरस्कृत जल अभियान मोहिमेबाबत...

2 messages

---

**Dr. Abhay Wagh** <director@dtemaharashtra.gov.in> Fri, Jun 18, 2021 at 5:17 PM
To: Asmita Naik <pa2director@dtemaharashtra.gov.in>

---------- Forwarded message ---------
From: **Kishor Jakate** <vishi5.hted-mh@gov.in>
Date: Fri, Jun 18, 2021 at 4:43 PM
Subject: केंद्र पुरस्कृत जल अभियान मोहिमेबाबत...
To: <director.dhepune@nic.in>, <director@dtemaharashtra.gov.in>

--
**Dr. Abhay Wagh**
Director
Directorate of Technical Education
Maharashtra State, Mumbai
www.dtemaharashtra.gov.in

---

**cr 37 new.pdf**
71K

---

**Asmita Naik** <pa2director@dtemaharashtra.gov.in> Mon, Jun 21, 2021 at 10:47 AM
To: DESK16 Desk Officer <desk16@dtemaharashtra.gov.in>

[Quoted text hidden]

---

**cr 37 new.pdf**
71K

Urgent

21/6

महाराष्ट्र शासन

*स्मरणपत्र-१*

क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३७/विशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दि. १८ जून, २०२१

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
२) संचालक, तांत्रिक शिक्षण संचालनालय, मुंबई

**विषय :** केंद्र पुरस्कृत जल अभियान मोहिमेबाबत...

**संदर्भ :** शासन समक्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३७/विशि-५, दि. २३/०३/२०२१ चे पत्र

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन पत्रान्वये विद्यापीठ/संस्थांनी सादर केलेला आराखडा व जलशक्ती अभियानासंदर्भात सुरु केलेल्या उपक्रमांबाबतचा प्रगती अहवाल शासनास दर महिन्याला एकत्रितरित्या सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच अद्याप प्रगती अहवाल अप्राप्त आहे. तरी एकत्रित प्रगती अहवाल आजच उलट-टपाली पाठविण्यात यावा.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

E:\prasad २०२०\पत्र २०२०.docx

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई -४००००१
दूरध्वनी क्र.०२२ २२६१६७०२ ईमेल : jsamaharashtra2021@gamil.com

पत्र क्र.रा. पा. व स्व.मि. /पापुशा-०१/ जशअ/ प्र.क्र. १३/२०२१ / ४३९ दिनांक: १९ /०३/२०२१

अत्यंत महत्वाचे

प्रति,
जिल्हाधिकारी,
(सर्व)

विषय : केंद्र शासन पुरस्कृत जलशक्ती अभियानातंर्गत करावयाच्या विविध कामांबाबत ..

संदर्भ :

१. राज्य पाणी व स्वच्छता विभाग, यांचे पत्र क्र. जेजेएम पापुशा०१/ प्र.क्र. १३/२६७/२०२१,दि. २२/०२/२०२१
२. केंद्र शासनाचे पत्रक्र. F No. ७७१/२/२०२१-CA.IV, दि. १६/०३/२०२१
३. केंद्र पुरस्कृत जल शक्ती अभियान (Catch the Rain) (JSA-CTR) मोहिमेबाबत व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे बैठक, दि. १८/०३/२०२१.

मा. पंतप्रधान यांनी जल शक्ती अभियान अंतर्गत दि.२२ मार्च, २०२१ रोजी जागतिक जल दिनाच्या निमित्ताने "Catch the Rain" हि मोहिम राबविण्याबाबत संबोधीत केले आहे. त्यास्तव केंद्र शासनाने जल शक्ती अभियान मोहिम राबविण्याबाबत मा. कॅबिनेट सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समितीची दि. १८/०३/२०२१ रोजी ५:३० वा. जल शक्ती अभियान अंतर्गत (Catch the Rain) (JSA-CTR) या विषयाबाबत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस मा. मुख्य सचिव हे व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे उपस्थित राहण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदरची बैठक मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयात पार पडली.

केंद्र शासनाने जल संधारण व भूजल पुनर्भरण यासंबंधी पावसाळयापूर्वी करावयाची तयारी याबाबत सविस्तर सूचना दिल्या असून सदर बाब राज्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. दि. २२/०३/२०२१ ते ३०/११/२०२१ या कालावधीत देशातील एकुण ७२९ जिल्हे, ७१९५ तालुके, २.५५ लक्ष ग्रामपंचायत व ६.६४ लक्ष गावांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व सर्वसामान्याचा सहभाग घेऊन जलसंधारणाची कामे जल शक्ती अभियानांतर्गत राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सन २०१८- १९ मध्ये राज्यातील ०८ जिल्हयांतील २० तालुक्यांसाठी जल शक्ती अभियान राबविण्यात आलेले आहे. केंद्र शासनाने या वर्षी सुध्दा सदर अभियान विस्तृत व अधिक प्रभावीपणे (संपुर्ण देशातील जिल्हयांसाठी) राबविण्याचे नियोजित केले आहे. त्याकरीता केंद्र शासनाच्या जल शक्ती मंत्रालय व इतर सर्व संबंधीत विभागांनी करावयाच्या कामांबाबत, निधीबाबत व अभिसरणबाबत विस्तृत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. यानुसार जिल्हास्तरावर उपलब्ध मनुष्यबळ आणि साधनसामुग्री यांचा योग्यप्रकारे वापर करून पावसाचे पाणी संकलन करण्यासाठी आवश्यक उपक्रम हाती घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. सदर अभियानासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी हे जिल्हा नोडल अधिकारी (DNO) असतील. तसेच उपजिल्हा स्तरावर उपविभागीय अधिकारी, तालुका स्तरावर (BNO) तहसीलदार व नागरी

क्षेत्रासाठी (UNO) नगरपालीकेचे मुख्याधिकारी व महानगरपालीका क्षेत्रात आयुक्त नोडल अधिकारी असतील.

२. विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या MNREGS कामांत सिंचन व जलसंधारणाची कामे, पाणलोट क्षेत्र विकासाची कामे आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत "Per Drop More Crop" ची कामे हाती घ्यावीत. जसे कि पाण्याचे स्त्रोत बळकठीकरण, भूजल पुनर्भरण, पाऊस पाणी संकलन, सांडपाणी व्यवस्थापन पुर्नभरण व पुर्नवापर, जलसंरचनांचे/जलस्त्रोतांचे पुनरूज्जीवन व नुतनीकरण/दुरुस्ती करणे व क्षमता पुनः स्थापना करणे, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन अंतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC-PMKSY), ज्या ठिकाणी आवश्यक आहे तेथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सांडपाणी व्यवस्थापनाच्या बाबीं १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून स्थानिक स्तरावर MGNREGS समवेत सांगड घालून करण्यात याव्यात. या करिता ग्रामविकास विभागातर्फे निर्गमित सूचनांनुसार कार्यवाही करावी.

३. या अभियानामध्ये सर्व नगर पालिका/ नगर परिषदा तसेच सर्व महानगर पालिका यांचा सहभाग अवश्यक असुन त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये जल संधारण व पाण्याचे तलाव यांचे पुर्नरुज्जीवनाची कामे हाती घ्यावीत.

४. दि. २२ मार्च, २०२१ रोजी ग्राम सभेचे आयोजन करुन जल शपथ घ्यावी आणि पाण्याच्या संर्वधनाबावत चर्चा करावी. (शपथ पत्राचा नमुना सोबत जोडलेला आहे.)

५. कृषी विज्ञान केंद्र यांच्या मदतीने जल संधारण बाबत व्यापक प्रसिध्दी दयावी. तसेच त्यांचे मार्फत सुक्ष्म सिंचनास चालना व पाण्याचे तांत्रिक व सुयोग्य नियोजन बाबत शेतक-यांना प्रशिक्षण दयावे.

६. वन क्षेत्रात पाऊस पाणी संकलानाची साधने निर्माण करावे व मान्सुन काळात वृक्षलागवड करण्याच्या दृष्टीने खड्डे व रोपे तयार ठेवावे.

७. शाळा, आंगणवाडी, आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी छतावरील पाऊस पाणी संकलनाचे अभियान काळात नियोजन करावे.

८. प्रत्येक जिल्हा मुख्यालयात जल शक्ती अभियाना अंतर्गत करावयाच्या कामाकरीता तांत्रिक मार्गदर्शनासाठी जल शक्ती केंद्राची स्थापना करावी.

९. अभियानाअंतर्गत राबविण्यात आलेल्या कामांची अदयावत नोंद जल शक्ती मंत्रालयाने विकसीत केलेल्या संकेतस्थळावर अदयावत करण्याची जबाबदारी नोडल अधिका-यांची असेल.

१०. याचप्रमाणे संदर्भ क्र. ०२ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील उपाययोजना (रिचार्ज शाफ्ट, ट्रेंच कम रिचार्ज शाफ्ट, पिण्याच्या पाण्याच्या /नळ पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीभोवती गोलाकार रिचार्ज ट्रेंच) जिल्हास्तरावर भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत १५ वित्त आयोग / किंवा MGNREGS अंतर्गत मोठया प्रमाणात राबवून घेण्यात याव्यात. तसेच जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत राबविण्यात आलेल्या/येत असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या स्त्रोतांसाठी देखील सदर बळकठीकरणाच्या उपाययोजना (पुनर्भरण चर/रिचार्ज शाफ्ट/ भूमिगत बंधारा) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे सहाय्याने संबंधित यंत्रणेने १५ वित्त आयोग/ MGNREGS अंतर्गत राबवून घेण्यात याव्यात.

११. MGNREGS अंतर्गत पारंपारीक व इतर पाण्याच्या संरचनांचे/ जलस्त्रोतांचे नूतनीकरण करण्याची कामे घेण्यात यावीत. याअनुषंगाने जिल्हास्तरावर अशा संरचनांची/जलस्त्रोतांची सदयस्थिती उपलब्ध करून घ्यावी. तसेच संबंधित महसूल प्रशासनामार्फत पाण्याच्या संरचना/ जलस्त्रोतांमध्ये झालेले

अतिक्रमित क्षेत्र हटविण्याची देखील कामे हाती घेण्यात यावीत. त्यानंतर नुतनीकरणामध्ये गाळ काढणे, इनलेट्स / आउटलेटचे बांधकाम, पाणलोट क्षेत्रामध्ये वनीकरण इत्यादी कामे प्राधान्याने करण्यात यावीत. त्याचप्रमाणे छोटया नदयांचे नूतनकरण नदीपात्र व्यवस्थापनाच्या माध्यमातून हाती घेण्यात यावे. जेणेकरून जलजीवन मिशनमध्ये ग्रामीण भागातील पाण्याचे स्त्रोतांची शाश्वततेमध्ये वाढ होऊन जल शक्ती मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशनसाठी याचा फायदा होईल. यानुसार संबंधित विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून अश्या कामांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

१२. यासाठी केंद्रीय भूजल मंडळाचे (CGWB) प्रादेशिक कार्यालय व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन अंतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचे (WDC-PMKSY) राज्यस्तरीय नोडल यंत्रणा यांचेकडून पाणी साठवण /भूजल पुनर्भरण बांधकामांसाठी योग्य जागा निश्चित करण्यासाठी तांत्रिक सहाय्य घेण्यात यावे. त्याचप्रमाणे नवीन कामांसाठी किंवा भूजल पुनर्भरण सुधारण्यासाठी अस्तित्वातील संरचनांमध्ये बदल करण्याबाबत देखील मार्गदर्शन घ्यावे.

१३. या सर्व कामांकरिता विविध विभागांच्या योजनांतून अभिसरण करावयाचे असल्याने त्या त्या कामांकरीता जलसंधारण, जलसंसाधन, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (मनरेगा), ग्रामविकास व संबंधीत विभागातर्फे निर्गमित सूचनांनुसार कार्यवाही करावी.

१४. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयामार्फत निर्गमित केलेल्या दि.१५/०४/२०२० आदेशानुसार Lockdown च्या कालावधीत MGNREGS अंतर्गत सिंचन व जलसंधारणाची कामे करण्यास प्राधान्य दिले आहे. यामुळे ग्राम विकास मंत्रालयाच्या दि.१५/०४/२०२० पत्रान्वये निर्गमित केलेल्या सविस्तर सूचनांनुसार सामाजिक अंतर, चेहऱ्यावर मास्क, सॅनिटायझर, हात धुण्याची व्यवस्था व इतर आवश्यक सावधगिरी बाळगुन सदर कामे हाती घेण्यात यावीत.

१५. आपल्यासह जिल्हा स्तरावरील सर्व संबंधीत विभागातील अधिकारी व सरपंच यांनी दि. २२/०३/२०२१ रोजीच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा व दि. २२/०३/२०२१ रोजी ग्रामसभांचे आयोजन करावे.

सदरील मोहिम आपले स्तरावर ४ टप्यांमध्ये राबवावयाची असुन, ४ टप्पे खालील प्रमाणे राहतील.

I. केद्र शासन पुरस्कृत जल शक्ती अभियानाअंतर्गत जनजागृती करणे.
II. कामांचा वार्षिक कृती आराखडा तयार करणे. ( सर्व संबंधीत विभागाच्या अधिका-यांनी क्षेत्र भेटी देवुन आराखडा तयार करावा.) ( पावसाळयापूर्वी )
III. प्रत्यक्ष कामांची अंमलबजावणी करणे. ( पावसाळया दरम्यान )
IV. जिल्हा / तालुका यंत्रणाकडून आराखडयातील कामांचे सनियंत्रण करणे. वेळोवेळी झालेल्या / केलेल्या कामांची संकेतस्थळावर माहितीची अदयावत नोंद करणे.

उपरोक्त दिलेल्या बाबीं विचारात घेऊन आपण व्यक्तिश: लक्ष देऊन जल शक्ती अभियानांतर्गत वरील प्रमाणे कार्यावाही करुन केलेल्या कार्यवाहीचा नियमित अहवाल सादर करावा. वेळोवेळी संकेतस्थळावर माहिती अदयावत करावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

(राजेश कुमार) भाप्रसे
अपर मुख्य सचिव
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

प्रत माहितीसाठी :

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण रोजगार हमी योजना विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सचिव, माहिती व जनसंपर्क संचनालय, मंत्रालय, मुंबई
१५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१६. विभागीय आयुक्त, (महसुल) सर्व
१७. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, सिडको भवन, नवी मुंबई
१८. विभागीय संचालक (Central), केंद्रीय भूजल मंडळ, नागपूर
१९. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, आयुक्त कार्यालय, नागपूर
२०. संचालक, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
आपल्या अधिनस्त जिल्हास्तरावरील यंत्रणांना सविस्तर सूचना देण्यात याव्यात.
२१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
आपल्या अधिनस्त जिल्हास्तरावरील संबंधित यंत्रणांना सविस्तर सूचना निर्गमित करण्यात याव्यात.
आपल्या स्तरावरून स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सांडपाणी व्यवस्थापनाबाबत उचित कार्यवाही साठी स्वंतत्रपणे जिल्हास्तरावरील यंत्रणांना सूचना देण्यात याव्यात.
२२. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
२३. उपजिल्हाधिकारी (रोहयो शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
२४. आयुक्त, महानगर पालिका सर्व.
२५. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पालिका सर्व.

Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

# जल शपथ

## जागतिक जल दिन – दि.२२ मार्च,२०२१

मी, पाणी बचतीची व पाण्याचा विवेकी वापर करण्याची प्रतिज्ञा करत आहे.

मी, पाण्याचा सुयोग्य वापर करण्याची प्रतिज्ञा देखील करीत आहे.

तसेच मी, पाण्याचा थेंब अन थेंब साठवेन आणि "कॅच द रेन" या अभियानाच्या यशस्वितेसाठी संपूर्ण सहयोग देईन.

मी, पाण्याला एक अनमोल संपदा मानेन आणि असे समजूनच पाण्याचा वापर करेन.

मी अशीही प्रतिज्ञा करत आहे की, मी माझे कुटुंबीय, मित्र आणि शेजाऱ्यांना पाण्याचा विवेकी वापर करण्याबाबत व पाण्याचा अपव्यय टाळण्याबाबत प्रेरित करेन. तसेच त्यासाठी सर्व आवश्यक प्रयत्न करेन.

ही वसुंधरा आपली आहे. आपणच या वसुंधरेला वाचवू शकतो आणि आपले भविष्य सुरक्षित करू शकतो.

यासाठी मी देशाचा जलरक्षक म्हणून कायम कार्यरत राहण्याची शपथ घेत आहे.

**********************

# Note on Jal Shakti Abhiyaan (JSA)

Within a month of announcing the Ministry of Jal Shakti, the government launched ***Jal Shakti Abhiyan (JSA), an intensive water conservation campaign built on citizen participation to accelerate water conservation*** across the country.

The Jal Shakti Abhiyan was launched by the Ministry of Jal Shakti in 2019. It is a campaign for water conservation and water security in the country through a collaborative effort of various ministries of the Government of India and state governments. The focus of the campaign is on water stressed districts and blocks. The important water conservation interventions were:

- Water conservation and rainwater harvesting,
- Renovation of traditional and other water bodies/tanks,
- Reuse of water and recharging of structures,
- Watershed development and
- Intensive afforestation.

During 2019, Jal Shakti Abhiyan covered 256 water stressed districts across the country. More than seventy- five lakh traditional and other water bodies and tanks were renovated and around a crore water conservation & rainwater harvesting structures were created.

In the short run, the campaign will focus on integrated demand and supply-side management of water at the local level, including creation of local infrastructure for source sustainability using rainwater harvesting, groundwater recharge and management of household wastewater for reuse.

For the long run, the government launched the Jal Jeevan Mission (JJM) with an aim to ensure piped water supply to all rural households by 2024.

| Jal Shakti Abhiyan – I (Mission Mode Campaign) | |
|---|---|
| Duration | 1st July 2019 – 30th Sep 2019 |
| Objective | Water Conservation |
| Theme | Jan Andolan |
| Coverage | 8 districts in Maharashtra and 20 blocks (refer Annexure I)<br>Total 256 districts in India |

| | |
|---|---|
| Activities | 1. Water Conservation & rainwater harvesting – 28,164 activities<br>2. Renovation of traditional water bodies – 9,521 activities<br>3. Reuse borewell recharge structures – 31,793 activities<br>4. Watershed Development – 18,263 activities<br>5. Intensive afforestation – 5,24,41,617 sapling planted; 2,31,13,657 seedlings raised in nurseries<br>(Refer Annexure II, IV TO X for details) |
| Additional Interventions Undertaken | • Prepared block and district level water conservation plan<br>• Organized Krishi Vigyan Mela at district level<br>• Proposal for urban wastewater reuse<br>• Mobilized teams at district level and sought support from IIT<br>• Prepared 3D-village contoured maps at district level for the purpose of planning<br>• The relative score and national ranking of 8 districts is attached in Annexure III. |
| Monitoring of JSA | Progress report of 5 interventions & IEC activities logged into ejalshakti.gov.in<br>Monitored by District Collectors |
| Actions taken by State Water and Sanitation Mission (SWSM) | Introductory meeting chaired by Hon'ble Additional Chief Secretary, WSSD (date – 4th July 2019) with following departments:<br>○ Soil & Water Conservation<br>○ Urban Development<br>○ Agriculture<br>○ Forests<br>○ Water Resources<br>○ Rural Development |
| | Formed Whatsapp group for expediting communication regarding daily update between GoI officers, Hon'ble Department Secretaries, 8 District Collectors, ZP CEOs and District Officers |
| | Hon'ble Chief Secretary, Maharashtra chaired review meeting of Secretaries of concerned Departments (date – 9th July 2019)<br>Instructed all departments to use Jalyukta Shivar Abhiyaan structure<br>Instructed all Departments to prepare Action Plan with timeline |
| | Facilitated Gram Sabha in each GP on 24th August 2019 |
| | Instructions from Hon'ble Additional Chief Secretary, WSSD to all 8 districts to achieve minimum 50 relative score & maintain rank within first 50.<br>The districts exhibited progress, intervention wise performance of the Districts and blocks is attached in Annexure IV TO X. |
| | WSSP office monitored daily progress and coordinated with District |
| | All 8 District Collectors were actively involved in improved implementation of JSA – I |
| Status of JSA I | Completed.<br>Letter issued to all 8 District Collectors (dated 16/10/2019) to geo-tag all non-MGNREGA assets of JSA – I & upload Achievement Certificate through District Login |

JSA – I witnessed active participation of State Governments, Central Government, Civil Society Organizations, Panchayati Raj Institutions and communities as a mass movement to conserve water.

Encouraged by the response received in 2019, Jal Shakti Abhiyaan – II was proposed in 2020. However due to the advent of the pandemic it was not implemented in the same spirit. The coverage for JSA – II included all districts within India with the tagline "Catch The Rain Where it Falls When It Falls".

The proposed plan included augmentation of existing water sources, ground water recharge, rainwater harvesting and greywater management of reuse and recharge (under SBM – G), rejuvenation of traditional water bodies (under MGNREGA), removal of encroachments (temporary or permanent) around water bodies, repair and restoration of water bodies (including rejuvenation of small rivers) and watershed management (under WDC- PMKSY).

The Department of Rural Development (MoRD, GoI), Department of Water Resources, River Development & Ganga Rejuvenation (Ministry of Jal Shakti, GoI), Department of Land Resources (Ministry of Rural Development, GoI) and Department of Drinking Water and Sanitation (Ministry of Jal Shakti, GoI) collectively wrote to the Chief Secretaries of all States on 24th April 2020 highlighting the necessity of preparing for water conservation and recharge before the onset of monsoon. But, the outbreak of novel Coronavirus calls for optimal deployment for preparatory activities. The Ministry of Home Affairs, GoI thus have allowed to take up the activities under MGNREGA (as per communication dated 15th April 2020) prioritizing irrigation and water conservation works. The communication instructed to issue directions to the district authorities for engaging available resources by converging available programmes for water conservation. The action taken WSSD, GoM was issuance of directions to all districts dated 30th June 2020.

The activities would ensure water source sustainability in rural areas and would strengthen the ongoing Jal Jeevan Mission (JJM).

| **Jal Shakti Abhiyaan - II (Mission Mode Campaign)** | |
|---|---|
| Duration | 21st Dec 2020 – 31st Mar 2021 (Awareness Campaign)<br>1st April 2021 – 30th June 2021 (Implementation Phase) |
| Objective | In addition to water conservation – In situ storage of rainwater |
| Theme | Catch The Rain (Catch the rain where it falls when it falls) |
| Coverage | All 34 districts of Maharashtra |
| Activities | 1. Create rainwater harvesting structures<br>2. Activate Nehru Yuva Kendra Sangathan<br>3. Create Jal Shakti Kendra in each district |

| | |
|---|---|
| | 4. Enumeration of water bodies<br>5. Identification and classification of encroachments<br>6. Rooftop rainwater harvesting structures in all government buildings<br>7. Tree plantation<br>8. Rejuvenation of rivers and streams<br>9. GIS mapping of existing water bodies |
| Time period | 3-month awareness campaign followed by implementation phase |
| Actions taken by WSSD | During JJM implementation, instructions were issued to utilize Convergence Fund at District Level to implement the following activities thus undertaken by WSSD:<br>• Water conservation & rainwater harvesting<br>• Renovation of traditional water bodies/tanks<br>• Reuse, borewell recharge structures<br>• Watershed Development<br>• Intensive afforestation carried out in convergence with existing schemes<br><br>SWSM also issued letter to all districts to initiate implementation of JSA-II as per guidance received from GoI. The letter also mentions to organize awareness campaign through the network of Nehru Seva Kendra Sangathan. |
| Status of JSA II | On-Going (timeline disrupted due to ongoing pandemic) |

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३७/विशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक- २३-३-२०२१.

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई

**विषय:- केंद्र पुरस्कृत जलशक्ती अभियान मोहिमेबाबत.**

महोदय,

मा.पंतप्रधान महोदयांनी जलशक्ती मंत्रालयामार्फत, २२ मार्च या जलदिनाचे औचित्य साधून जलशक्ती अभियान: Catch the Rain या मोहिमेची सुरुवात दि.२२.०३.२०२१ पासून केलेली आहे.

यासंदर्भात भारत सरकार कडून प्राप्त झालेल्या टिप्पणीची प्रत व विश्वविद्यालय अनुदान आयोगाने दि.१९-३-२०२१ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व विद्यापीठांना, महाविद्यालयांना, संस्थांना दिलेली सूचनेची प्रत यासोबत जोडलेली आहे.

जलसंवर्धन व जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत केंद्र शासनाने व विश्वविद्यालय अनुदान आयोगाने सूचना दिलेल्या आहेत. जलसंवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्याच्या दृष्टिने तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांमध्ये जागरूकता वाढविण्याच्या दृष्टिने सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे, सर्व महाविद्यालये, सर्व शैक्षणिक संस्था स्तरावर जलसंवर्धन व जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रम प्रभाविपणे राबविण्याबाबत आपल्या स्तरावरून तातडीने सूचना देण्यात याव्यात. तसेच केंद्र शासनाने व विश्वविद्यालय आयोगाने नमूद केलेल्या उपक्रमांचा आराखडा तयार करून ग्रामीण भागासाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांच्याकडे व शहरी भागासाठी महानगर पालिका आयुक्त/ नगर पालिका अधिकारी यांच्याकडे संपर्क करून सादर करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

विद्यापीठ/संस्थांनी सादर केलेला आराखडा व जलशक्ती अभियानासंदर्भात सुरू केलेल्या उपक्रमांबाबतचा प्रगती अहवाल शासनास दर महिन्याला एकत्रितरित्या सादर करण्यात यावा.

आपला,

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-
सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे

महाराष्ट्र शासन

स्मरणपत्र-१

क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३७/विशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दि. १८ जून, २०२१

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
२) संचालक, तांत्रिक शिक्षण संचालनालय, मुंबई

**विषय** : केंद्र पुरस्कृत जल अभियान मोहिमेबाबत...
**संदर्भ** : शासन समक्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३७/विशि-५, दि. २३/०३/२०२१ चे पत्र

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन पत्रान्वये विद्यापीठ/संस्थांनी सादर केलेला आराखडा व जलशक्ती अभियानासंदर्भात सुरु केलेल्या उपक्रमांबाबतचा प्रगती अहवाल शासनास दर महिन्याला एकत्रितरित्या सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच अद्याप प्रगती अहवाल अप्राप्त आहे. तरी एकत्रित प्रगती अहवाल आजच उलट-टपाली पाठविण्यात यावा.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

E:\prasad २०२०\पत्र २०२०.docx

p2director@dtem

બાપુનગરના મકાની, સારવાર

22820719

715071250 આયેલાના

उ.स. (साशि)
Inform all concern
9/3/21

प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय
क्र. 354
दि. 17/3/21

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,

क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय इमारत, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्र. ०२२/२२६२१७६८
Email ID: chetan.nikam@nic.in

---

क्रमांक : संकिर्ण-०३२१/प्र.क्र.७२/ पापु-१० दिनांक : १६ मार्च, २०२१.

प्रति,

(१) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग.
(२) विभागीय आयुक्त (सर्व).
(३) जिल्हाधिकारी (सर्व).
(४) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
(६) मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपरिषद (सर्व).
(७) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.
(८) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
(९) मिशन संचालक, जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.

विषय : जागतिक जल सप्ताह राबविण्याबाबत
दिनांक २२ मार्च, २०२१ ते दिनांक २७ मार्च, २०२१.

महोदया / महोदय,

पाण्याचे महत्व अधोरोखीत करुन आणि त्याच्या सर्वकाळ उपलब्धतेसाठी सर्वांचे लक्ष केंद्रीत करुन सर्वव्यापी उपाययोजना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांद्वारे सन १९९३ पासून दरवर्षी २२ मार्च रोजी "जागतिक जल दिन" साजरा केला जातो. जागतिक जल दिनाच्या निमित्ताने जगातील शुध्द व सुरक्षीत पाण्याशिवाय जगणाऱ्या जनसमुदायात जागृती निर्माण केली जात आहे.

०२. पाण्याचा नियोजनबध्द वापर केल्यास दुष्काळ, पाणीटंचाई, पाणी प्रदुषण आणि हवामानातील बदल यासारखे महत्वाच्या समस्यांवर उपाययोजना करता येतात. हवामानातील बदलामुळे पाण्याच्या उपलब्धतेवर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी, आरोग्य आणि जीवनाच्या रक्षणासाठी प्रत्येकाची भुमिका महत्वाची आहे. याकरिता शाश्वत, परवडणारे आणि सहज सर्वदूर वापरण्याजोगे उपाय शोधून ते अंगिकारण्याची गरज आहे. यासाठी "जागतिक जलदिन" ही

(13)

Please circulate to all directors

Scanned by CamScanner